Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# संत श्री. निळोबाराय पिंपळनेरकर

**प्रा. हरिदास शंकर जाधव**
इतिहास व प्रा.भा.इ.सं आणि पुरातत्त्वशास्त्र, चां. ता. बोरा महाविद्यालय, शिरुर जि.पुणे.

प्राचीन काळापासून अहमदनगर जिल्हयात महत्त्वाच्या राजवंशांनी आपली राजकीय सत्ता गाजविली. अहमदनगर हा प्रांत इ.स. पूर्व 90 ते 300 पर्यंत पैठणच्या सातवाहनांकडे होता. इ.स. 550 ते 670 पर्यंत येथे चालुक्यांची सत्ता होती. इ.स. 670 ते 973 याकाळात हा प्रदेश राष्ट्रकुटांकडे होता. इ.स. 973 ते 1190 पर्यंत हा प्रांत पुन्हा चालुक्यांकडे आला. इ.स. 1191 ते 1310 पर्यंत हा प्रांत देवगिरीच्या यादवांकडे होता. महानुभाव साहित्यात या प्रदेषाचा उल्लेख महंतराष्ट्र असा केला आहे.[1] ज्ञानेश्वरांनी देखिल ज्ञानेश्वरीत रामदेवराव यादवांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.[2] या जिल्हयाला मध्ययुगीन काळात मोठी राजकीय परंपरा लाभलेली तर आहेच पण त्याच बरोबर मोठी संत परंपराही लाभलेली दिसून येते. या जिल्हयाचे वैशिष्टय असे की, जवळजवळ सर्व पंथांचा उदय हा अहमदनगरच्या कुषीतून झालेला आहे. नाथपंथाचे आदरस्थान असलेले मढी व इतर पवित्र स्थाने गर्भगिरीच्या डोंगराच्या कुषीत आहेत. नवनाथ व ज्ञानेश्वरांपासून सुरु झालेली भक्ती परंपरा आधुनिक कालखंडातही कायम होती असे आपल्याला दिसून येते. या भक्तीपरंपरेतील संत श्री निळोबाराय पिंपळनेरकर हे एक महत्त्वाचे संत या जिल्हयात होऊन गेले. संत निळोबाराय पिंपरनेरकर हे वारकरी संप्रदायातील अखेरचे संतकवी होत. संत तुकारामांच्या नंतर विपुलतेने अभंगरचना करुन वारकरी संप्रदायात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारा एक संत कवी म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांना महत्वपूर्ण स्थान दिले जाते. वास्तविक पाहता तुकोबांचे चैदा टाळकरी होते त्यात संताजी जगनाडे, मंबाजी, रामेश्वरभट, शिवबाकासार, कान्होबा वगैरे असले तरी अभंगवाङ्मयात भरीव भर घालणारा असा निळोबारायच. आवटे गाथ्यात त्यांचे दीड हजारावर अभंग आहेत.[3] प्रसिध्द संत चरित्रकार महिपती हे निळोबांचे समकालीन गुरुबंधू होत. तथापि, या दोघांची प्रत्यक्षात भेट झालेली दिसत नाही. निळोबांच्या निर्वाणानंतर महिपतींच्या कानावर निळोबांची प्रसिध्दी जावून ते पिंपळनेर येथे

गेले व त्यांनी निळोबांच्या मुलाकडून त्यांची चरित्रविषयक माहिती मिळविली व ती आपल्या 'भक्तविजय' या ग्रंथात त्रोटक स्वरुपात दिलेली आहे.[4]

**नेणे मान दांभिकपणा । सद्भावे करी हरिकीर्तन ।। पुरातन संतांची उत्तरे बोलोन । संतचरित्रे वर्णावीं ।। मुलें लेकुरें असली । परी मी माझे न वेची चित्तीं ।। सहजची मिळे अयचित वृत्ती । त्यांतही अतिथी पूजावा ।।[5]**

वरील ओव्यांत महिपतींनी संत निळोबारायांचे वर्णन मार्मिक रितीने केलेले दिसते. पारमार्थिक जीवन कसे जगावे याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे संत निळोबांचे जीवन होय. यांचा जन्म शिरुर येथे झाला. अहमदनगर जिल्हयातील पिंपळनेर हे त्यांचे गाव. निळोबा मुकुंद मकासरे हे त्यांचे पूर्ण नाव. त्यांच्या घराण्याकडे शिरुरच्या जोशी व कुलकर्णी पणाची वृत्ती चालत आली होती. वडिलांनंतर निळोबाच सर्व कारभार पाहत असे. पण एके दिवशी उद्वेगाने त्यांनी नोकरी झिडकारुन तुकोबांच्या घरी येऊन स्वर्गस्थ तुकोबांच्या दर्शनाकरिता बेचाळीस दिवस उपोषण केले. परमेष्वर प्राप्तीपेक्षा सद्गुरु दर्शन त्यांना महत्वाचे होते. म्हणून ते परमेश्वरास म्हणतात की,

**येथें तुज-पासी बोलविले कोणी । प्रार्थल्यावांचूनि आलासि का? निळा म्हणे, आम्ही नोळखूंच देवा । तुकयाचा धावा करितसो ।।[6]**

देवाच्या प्राप्ती साठी असंख्य भक्तांनी धावा केला, खटाटोप केला. आयुष्य खर्ची घातले पण सद्गुरुंची प्राप्ती व्हावी म्हणून परमेश्वराला आळविणारा, त्याची प्रार्थना करणारा हा पहिलाच संत म्हणावा लागेल.7 ईष्वरसेवा आणि राजसेवा या दोन्ही गोष्टी एकाच वेळी जमणार नाहीत म्हणून राजसेवेचा त्याग करुन परमार्थप्रवण झालेल्या त्यांच्या मनाने तुकोबांचा छंद घेतला. यावेळी तुकारामांच्या निर्वाणास वीस-पंचवीस वर्षे झालेली होती त्यामुळे त्यांचे दर्शन होणे शक्य नव्हते. परंतु,' मनी असे ते स्वप्नी दिसे' या न्यायाने त्यांना देहूस आल्यावर तुकारामांचा स्वप्न साक्षात्कार व अनुग्रहही झाला. तुकारामांच्या काव्यास जसे नामदेव अप्रत्यक्षरित्या कारणीभूत झाले त्याप्रमाणे निळोबांचे काव्यही त्यांच्या तुकारामभक्तीतून स्फुरलेले दिसते. त्यामुळे त्यांची वाड्मयीन परंपरा नामदेव-तुकाराम-निळोबा अशी आहे.8 संत निळोबारायांचे वाङ्मयीन कार्य निळोबांची गाथाः इ.स. 1881 मध्ये तुकारामतात्या पडवळ यांनी निळोबांच्या गाथेची पहिली आवृत्ती प्रसिध्द केली. तेथपासून ते इ.स 1967 मधील चित्रशाळेच्या गाथेपर्यंत प्रसिध्द झालेल्या निळोबांच्या पाच निरनिराळया गाथांमध्ये समाविष्ठ झालेल्या अभंगांची संख्या दीड हजारांवर आहे. यामध्ये तुकाराम महाराजांची स्तुती हेही प्रकरण समाविष्ट आहे. निळोबांच्या गाथ्यातील कविता अभंग, ओवी आणि श्लोक या तीन स्वरुपात प्रकटली तरी प्राधान्य करुन अभंगात्मक आहे.[9] पंढरीमहात्म्य, संतमहात्म्य, गौळणी, विलस्तुती, करुणास्थिती, आत्मस्थिती, गुरुमहात्म्य इ. विषय हाताळलेले दिसतात. निळोबांची ही विपुल अभंगरचना म्हणजे वारकरी काव्यपरंपरेला आलेले अखेरचे उधाण होय. निळोबांच्या अभंगवाणीने केवळ तुकारामांचीच नव्हेतर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आदी संतांच्या काव्य

Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

निर्मितीचीही स्मृती जागविण्याचा साक्षेपी प्रयत्न केलेला दिसतो. याशिवाय निळोबांनी 160 अभंगातून वर्णिलेले कृष्ण चरित्र, 179 अभंगातून गायिलेल पंढरीमाहात्म्य, 233 अभंगातून आपल्या स्थिती संबंधी देवांशी व जनांशी काढलेले उद्गार, 125 अभंगातून केलेले संतांचे वर्णन, 60 अभंगातून रचलेले चांगदेव चरित्र व प्रदीर्घस्वरुपात केलेली तुकाराम स्तुती इ. काव्यरचना अभ्यासनीय ठरतात.10 यामध्ये विशेषम्हणजे इतर संत कवीनी न स्पर्षिलेले एक अद्भूत दालन म्हणजे उपेक्षित चांगदेव चरित्राला काव्यबध्द करण्याचे पहिले श्रेय निळोबांकडेच जाते. वारकरी संप्रदायाच्या काव्य परंपरेतील चरित्रवाङ्मयाची उणीव भरुन काढण्याचे मौलिक प्रयत्न निळोबांनी केले. प्रत्यक्ष गुरुचा म्हणजेच तुकारामांचा सहवास अजिबात लाभलेला नसताना केवळ त्यांच्यां अंभंगवाणीतून स्फुर्ती घेऊन निळोबांनी जे वाङ्मयीन आणि पारमार्थिक कार्य केले त्याला मराठी साहित्याच्या इतिहासात तोड नाही. थोडक्यात तुकारामांनंतर वारकरीसंप्रदायाचा वारसा संत निळोबारायांकडेच आलेला आपल्याला दिसून येतो. आपल्या यीन व पारमार्थिक कार्याने भागवत धर्माची पताका महाराष्ट्रभर पुन्हा एकवार नाचविण्याचे महत्कार्य त्यांनी केले.

## संदर्भ आणि टिपा

1. ढेरे रा.चिं (संपा.), ‘ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वरी’, प्रस्तावना, पृ. 9
2. अभ्यंकर शंकर, ज्ञानेश्वरांचा भक्तियोग, पृ. 7
3. केळकर द.के.,‘मराठी साहित्याचे सिंहावलोकन’, पृ. 291
4. मालशे स.गं (संपा.), ‘मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा’, सौ. सुहासिनी इर्लेकर, ‘तुकारामांची प्रभावळ, पृ. 210
5. गोसावी र. रा. व सौ. वीणा गोसावी, ‘भक्तिविजय-महिपती’, अ. 5
6. ओवी 149 ते 150 6- केळकर द. के. ,‘मराठी साहित्याचे सिंहावलोकन’, पृ. 291
7. गोसावी र. रा. व सौ. वीणा गोसावी, ‘भक्तिविजय-महिपती’, निळोबा चरित्र, पृ. 26
8. भावे वि. ल, ‘महाराष्ट्र सारस्वत’, आवृत्ती 5, पृ. 849
9. मालशे स.गं (संपा.), ‘मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा’, सौ. सुहासिनी इर्लेकर, ‘तुकारामांची प्रभावळ, पृ. 212 10- तत्रैव, पृ. 212